सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक १२/१२/२०२३

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन,गृह विभाग, शासन निर्णय क्र.पोलीस -१४२३/प्र.क्र.२४४/पोल-५अ, नागपूर शिबिर कार्यालय, दिनांक ११ डिसेंबर, २०२३

**विषय :-** १० पोलीस प्रशिक्षण केंद्रांची क्षमता एकूण ५,००० प्रशिक्षणार्थीने दोन टप्प्यात वाढविणेस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र.पोलीस-१४२३/प्र.क्र.२४४/पोल-५अ, नागपूर शिबिर कार्यालय, दिनांक ११ डिसेंबर, २०२३ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३१२१११२३०१८५०२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, (प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके " सर्वसाधारण " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**१० पोलीस प्रशिक्षण केंद्रांची क्षमता एकूण ५,००० प्रशिक्षणार्थीने दोन टप्प्यात वाढविणेस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.......**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: पोलीस-१४२३/प्र.क.२४४/पोल-५अ**
**नागपूर शिबिर कार्यालय हॉल क्र.१**
**नवी इमारत, तळ मजला हैद्राबाद हाऊस, नागपूर-४४०००१**
**दिनांक :- ११ डिसेंबर, २०२३**

**वाचा :-**

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व संचालनालय कार्यालयाचे पत्र क्र. अपोमनि/ प्रशि/आस्था-१/बांधकाम/३०७९/२०२३, दि.१८.१०.२०२३

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्य पोलीस दलात नव्याने भरती झालेल्या पोलीस शिपाई व चालक पोलीस शिपाई यांना मूलभूत प्रशिक्षण तसेच पोलीस अंमलदार यांना सेवांतर्गत प्रशिक्षण देण्याकरीता एकूण १० पोलीस प्रशिक्षण केंद्र कार्यरत आहेत. सदर, १० प्रशिक्षण केंद्राची एकूण क्षमता ८,४०० इतकी आहे.

महाराष्ट्र पोलीस दलात नव्याने भरती झालेल्या पोलीस शिपाई व चालक पोलीस शिपाई यांना पूर्ण संख्येने दोन सत्रामध्ये मूलभूत प्रशिक्षण पूर्ण करण्यास दीड वर्ष इतका कालावधी व भरती प्रक्रियेकरीता अंदाजे ६ महिने असा मिळून एकूण २ वर्षाचा कालावधी लागतो. या २ वर्षाच्या कालावधीमध्ये पोलीस शिपाई व चालक पोलीस शिपाई संवर्गाची नव्याने १२-१५ हजार इतकी पदे रिक्त होतात व त्यानुषंगाने, पुन्हा मोठया संख्येने भरती प्रक्रिया पार पाडणे व प्रशिक्षण देणे क्रमप्राप्त ठरते. सद्यस्थितीत, सन २०२३ मध्ये राज्य पोलीस दलात नव्याने भरती झालेल्या पोलीस शिपाई व चालक पोलीस शिपाई यांचे सर्व पोलीस प्रशिक्षण केंद्रात पूर्ण क्षमतेने मुलभूत प्रशिक्षण सुरु असल्याने, पोलीस अंमलदाराच्या सेवांतर्गत प्रशिक्षणामध्ये माहे जून,२०२३ पासून खंड पडला आहे. सदरचे सेवांतर्गत प्रशिक्षण हे अत्यंत महत्वाचे आहे. तथापि, भविष्यात देखील मूलभूत प्रशिक्षण पूर्ण क्षमतेने सुरु राहणार असल्याने पोलीस अंमलदारांचे सेवांतर्गत प्रशिक्षण घेणे शक्य होणार नाही. त्यामुळे, भविष्यात नवनियुक्त पोलीस अंमलदार यांचे मूलभूत प्रशिक्षण विहीत वेळेत पूर्ण करणे व पोलीस अंमलदारांना सेवांतर्गत प्रशिक्षण देणे या दोन्ही प्रक्रिया एकाच वेळी शक्य होण्याकरीता अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व संचालनालय कार्यालयाच्या संदर्भाधिन दि.१८.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये पोलीस प्रशिक्षण केंद्राची क्षमता पहिल्या टप्प्यात २५०० व दुसऱ्या टप्प्यात २५०० इतकी वाढविण्यात येऊन नव्याने सर्व सोयी-सुविधा निर्माण करण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्यानुसार, पोलीस प्रशिक्षण केंद्राची प्रशिक्षणार्थींची क्षमता ५००० ने वाढविण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :-**

खालील नमूद एकूण १० पोलीस प्रशिक्षण केंद्रांची प्रशिक्षणार्थींची क्षमता ८,४०० वरून वाढवून १३,४०० करण्यास या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रशिक्षणार्थींची क्षमता खाली नमूद केल्याप्रमाणे दोन टप्प्यामध्ये प्रत्येकी २,५०० प्रमाणे यावी.

Scanned with CamScanner

| अ. क्र. | प्रशिक्षण केंद्राचे नाव | सध्याची प्रशिक्षणार्थींची क्षमता (संख्या) | वाढवून दयावयाच्या प्रशिक्षणार्थींची क्षमता (संख्या) | वाढविण्यात आलेली प्रशिक्षणार्थींची क्षमता (संख्या) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | **पहिला टप्पा** | | |
| १ | पोलीस प्रशिक्षण केंद्र मरोळ | ५०० | ५०० | १००० |
| २ | पोलीस प्रशिक्षण केंद्र नानवीज-दौंड | ८०० | ५०० | १३०० |
| ३ | पोलीस प्रशिक्षण केंद्र सोलापूर | १२०० | ५०० | १७०० |
| ४ | पोलीस प्रशिक्षण केंद्र जालना | १२०० | ५०० | १७०० |
| ५ | पोलीस प्रशिक्षण केंद्र नागपूर | १२०० | ५०० | १७०० |
| | **एकूण (अ)** | **४९००** | **२५००** | **७४००** |
| | | **दुसरा टप्पा** | | |
| १ | पोलीस प्रशिक्षण केंद्र खंडाळा | ६०० | ५०० | ११०० |
| २ | पोलीस प्रशिक्षण केंद्र तुरची-सांगली | ६०० | ५०० | ११०० |
| ३ | पोलीस प्रशिक्षण केंद्र बाभूळगांव-लातूर | ९०० | ५०० | १४०० |
| ४ | पोलीस प्रशिक्षण केंद्र धुळे | ६०० | ५०० | ११०० |
| ५ | पोलीस प्रशिक्षण केंद्र अकोला | ८०० | ५०० | १३०० |
| | **एकूण (ब)** | **३५००** | **२५००** | **६०००** |
| | **एकूण (अ) + (ब)** | **८४००** | **५०००** | **१३४००** |

२. उपरोक्त प्रमाणे प्रशिक्षणार्थींची क्षमता वाढविण्याच्या अनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३१२१११२३०१८५०२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GAIKWAD GANESH SUDAM

Digitally signed by GAIKWAD GANESH SUDAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=f88a2df366dbf702eda9179bfdd100f151490e691798947c7f6d1b8cf0dab766, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=0585EFA444AE7B29EC4D54E290F9F826C6E4DE96799148FCFC4C6E13F203B34E, cn=GAIKWAD GANESH SUDAM
Date: 2023.12.11 12:58:56 +05'30'

**( गणेश गायकवाड )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव, राजभवन,मुंबई
२. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई



Scanned with CamScanner

३. मा. उप मुख्यमंत्री महोदय यांचे सचिव, मंत्रालय,मुंबई
४. अपर मुख्य सचिव (गृह),गृह विभाग, मंत्रालय,मुंबई
५. प्रधान सचिव (अपील व सुरक्षा),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई
६. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग,मंत्रालय,मुंबई
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.),पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१३. सह सचिव/उप सचिव (अर्थ-१),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई
१४. निवडनस्ती (पोल-५अ)



Scanned with CamScanner